वाखाणुनीयां नृप त्यास बोले, ह्मणे तुवां युद्ध अपूर्व केलें ॥
आतां जरी जीवन इच्छिसी तूं, आह्मा मिळें सोडुनि सर्व किंतु[1] १२
तो[2] उत्तरा देत नरेश्वरास, असे जिवाची तुजलाच आस ॥
तरीं मला तूं शरणार्थि होई, आलास तैसा स्वपुरास जाई। १३।
च.कर्येंचढेह्यानृपथोर कोपा, लावोनियां बाण सुतीक्ष्ण चापा ॥
न लागतां ही पळएक साचें, तोडूनि पाडी शिर वैरियाचें १४
करीत होते रण चंद्रपुत्र, पराक्रमा दाविति ते विचित्र[3] ॥
होऊनियां पूत नृपास्त्रपातें, गेले त्वरें तेहि सुरालयातें[4] ।१५।

**आर्या.**

हाहाकार करित तें, रिपुसैनिक लागले पळायास ॥
दे नविदाम त्यां नृप, जे आले शरण शीघ्र पांयास[5] ॥ १६ ॥

**श्लोक.**

वासोटनामा बहु थोर किल्ला, घेई तयालाहि करोनि हल्ला ॥ तो वासोटा किल्ला घेतो.
अशारितीजावळिचाप्रदेश, संपूर्णजिंकीस्वबळें नरेश ॥ १७ ॥
रोहिडाख्य हो दुर्ग जो असे, त्यास जिंकण्या भप येतसे ॥ रोहिडा किल्ला रात्रीं शिडीलावून घेतो.
घेउनी सर्वे लोक मावळी, त्यांवरी चढे भूपती बळी ॥ १८ ॥

जरि नसे चढण्या वरि मार्ग हा,
शिडिच लाउनियां चढला पहा ॥
जंव निशा प्रहरद्वय जाहली,
तंव नृपाळिचमू[6] वर पातली ॥ १९ ॥

निद्रिस्त होता तंव दुर्गपाळ, उठे तदा ऐकुनि घालमेल ॥
तत्काळ पाहोनि रिपूसत्यानें, खड्गा सुतीक्ष्णा धरिलें करानें २०

---

१ संशय. २ हिम्मतराव. ३ पवित्र. ४ स्वर्गास. ५ आपल्या पायास. ६ शिवाजीचें लश्कर.

जाला आपक्षितिपति[1], ह्मणुनच जाणों पठाण अलीचे[2-3] ॥
केवळे भूपति सोडुनि, सेवक झाले शिवांघ्रिवल्लीचे[4]॥५०॥
चंद्रघ्नरघुत्रा[5-6] तो, केला सैनिक पठाणलोकांचा ॥
तेजोभंजक रिपुचा, नच शोभति होहिऱ्या पुढें कांचा॥५१॥

### श्लोक.

ऐसा त्याचा प्रतापज्वलन[7] अनुदिनीं वाढता होय जेव्हां,
नेटाजी मुख्य सेनाधिप पवनचि[8-9] ते जाहले साह्य तेव्हां ॥
वैरिव्रांताटवीचें[10] दहन करित तैं धूम जो कां निघाला,
त्यायोगें अलिकीर्त्योषधिप[11],जणुं तैये[12]कां[13]लिमाप्राप्तजाला॥५२

अली हा अफ़सुलखाना-ला शिवाजीवर योजितो.

ऐसा तो रिपु पाहुनी प्रबळ हो, अलीनृपें सत्वरी,
कोपानें बहु सैन्य सिद्ध करूनी, त्या योजिलें त्यावरी ॥
होता आफ़सुलखान नामक मुसल्मान प्रतापी महा,
सेनानायक त्याजला करुनियां धाडीतसे तो पहा ॥५३॥
घोडेस्वार तसेंच पायदळ जें योधांस ही मारितें,
तोफा आणिक खड्ग तोमर, गदा, भाले, न वापीं रिते[14]
जे जाला मदमत्तवारण, तसीं उंटें अकुंठें हि तीं,
सेना आफ़सुलखान घेउनि निघे, हाले भरें तैं क्षिती५४
जातां गर्जुनि तो[15] वदे निजजनांमाजी बहू दांडगा,
जैसा कां विपिनीं[16] कुरंगनिकरीं[17] बैसोनियां लांडगा ॥

१ आप आणि क्षिति या दोहींचाही पति शिवाजी ह्मणून. २-३ एक्या क्षितीचाच पति (अली) ४ शिवाजीचे चरणवल्लीचे. ५-६ चंद्रराव मोऱ्याला मारणारा रघुनाथपंत. ७ प्रतापरूप अग्नि. ८-९ नेताजी पालकर प्रमुख सरदार हेंच वायु. १० शत्रुसमुदायरूप अरण्याचें. ११ अलीचा कीर्तिरूप चंद्र. १२ अलीच्या कीर्तिरूप चंद्राला. १३ काळेपणा. १४ शून्य (हें भाल्याचें विशेषण.) १५ आफ़ूसुलखान. १६ अरण्यांत. १७ हरिणाच्या समुदायांत.

कपटादरेंचि दिल्ली-पति त्या नेई निजात्मजासहित ॥
स्वपुरा, दुर्योधनसा, धर्मावंचूनि साधण्या स्वहित ॥३५॥

अवरंगजेब हा शिवाजीला पुत्र सहित कपटानें दिल्लीस नेतो.

दिल्लीपुरास गेल्या-वरि त्याला, समजलेंचि कृत्रिम तें ॥
दुष्टाच्या वचनीं विश्वासार्पण हें अयोग्य शिष्टमतें ॥३६॥

शाठ्य शठीं या न्यायें, वंचोनी भूप दिल्लिपतिलाही ॥
गेला, समजुनियां हें, जाली तत्काळ, शत्रुची लाही॥३७॥

त्याला फसवून शिवाजी परत स्वदेशीं येतो.

सैन्यां उत्तेजन ये, येतां तो भूपती स्वगेहास ॥
चैतन्यागमयोगें, येतें जेवीं गतासु देहास ॥३८॥

त्याच्या येण्यानें त्याच्या सेनेस उत्तेजन येतें तें सदृष्टांत.

मग तो नरेश बहुतचि, चित्तीं काळाग्निरुद्रसा खवळे ॥
वाटे सकळ हि आतां, रिपुलोकां ग्रासिल क्षणांत बळें ३९

मग तो शिवाजी अत्यंत कोपायमान होऊन.

गजहयपत्तीयादिक, अपार करि सिद्ध भूप सैन्यास ॥
यद्गणनार्थ पुरेना, गणकाचा अल्प अंकविन्यास॥४०॥

शत्रूस जिंकायास निघतो तो प्रकार.

मदसस्तहस्ति ज्याच्या, सेनेतिल भासती क्ष्माधरसे ॥
वर्षाकाळींपरि यन्मस्तक भिजलें, सदैव दानरसें ॥४१॥

हत्तीचें वर्णन.

यज्जंघाल तुरंगमसंघ बहुत चांगला तैया गमला ॥
लपला यास्तव नाकीं, वाटे उच्चैःश्रवा तुरंग मला ॥४२॥

घोड्याचें वर्णन.

---

१ अवरंगजेब. २ त्याच्या पुत्रासुद्धां. ३ दिल्लीस. ४–५ धर्मराजाला दुर्योधनानें वंचिलें तसा. ६ शठेशाठ्यंसमाचरेत् असा न्याय आहे. ७ अवरंगजेबाला. ८ सेनेला. ९ शिवाजी. १० जीवयेण्यानें. ११ मेलेल्या देहास. १२–१३ शिवाजी. १४ गणित. १५ पर्वतासारिखे. १६ पर्जन्यकाळीं जसे त्याप्रमाणें. १७ ज्याची डोकीं. १८ मदोदकानें. १९ ज्याचे वेगवान घोड्याचा समुदाय. २० उच्चैःश्रव्याला.

मारामार गुन्हे दगा करिति जे, त्यांचा निवाडा क
[illegible] न्यायाधीश असी तयास दिधली आख्या नृपाळें ब
शास्त्रें पाहुनि पृच्छकास कथितो प्रश्नोत्तरां जो नर
त्यातें पंडितराव नांव वहिलें देती धराधीश्वर ॥
ऐसे अष्ट महा प्रधान अपल्या कार्यार्थ संस्थापुनी,
केलें राज्य शिवाजिनें निजबळें शत्रू लया लावुनी॥
बाळाजी अवजी, विसाजि मथुरे, अण्णाजि दत्तो,
[illegible] कृष्णाजी सखजी, शिवाजि नृहरी, कोन्हेरपंत, क्रमे
काशीपंत, निराजि रावजि, तिमाजी शामजी नायिक
पुढें त्रिंबक भास्कराख्य, सुमती विश्वासरावादिक ॥
मोरो त्रिंबक पिंगळे, नरहरि आनंदरायाव्हय,
बाळाजी रघुनाथ, रावजि सुभे, व्येंकाजि दत्तात्रय
संकाजी निळकंठ, शामजि अवा, ऐसाजि गोविंदजी
ऐसे कारकुनांत मुख्य असती मुत्सद्दिच्या ही व्रजीं॥
विश्वासू नर ठेवितो स्वनिकटीं रक्षार्थ राज्याचिया,
राहेना मग अल्पही रिपुकृता शंका तया राजया ॥
[illegible] कार्यीं निज सेवकांस विपुला जी देतसे संपदा,
सांगे तीच जनां कृतज्ञपण हो लोकांत त्याचें सदा॥
[illegible] तो मित्रापरि सेवकां गणितसे, संप्रेमवृत्ती सदा,
मित्रातें निजबंधुसीं सम गणी देवोनियां संपदा॥
तैसे बंधुजनास आत्मसम तो मानीतसे तत्वतां,
ऐसा सेवकमित्रबंधुसह तो वागे शिवाजी स्वतां ॥ ३७
[illegible] कामक्रोधादि सारा रिपुगण जिणुनी इंद्रियांचा जयानें
वागू इच्छीतसे तो मनुविहितपथें दुर्गमें ही श्रमानें ॥

१ मनूनें सांगितलेल्या रीतीनें. २ कठिणें ( हें पथाचें विशे

तो नर नव्हेचि अंध, क्षितीश्वरा जो विहीन नयन
क्रोधाधीनचि अंध, श्रेष्ठ वदति त्यांत अन्यथा नाहीं॥
लोभ. पापाला मूळ असे, लोभ असें सर्व बोलती संत ॥
जो त्यागी लोभातें, त्याच्या सौख्या नसेचि बा अंत॥
मोह. अज्ञानें मोह पडे यास्तव तूं ज्ञान आधिं संपादी
नसताही सर्प दिसे, अज्ञानाच्या वशेंचि, जी वादी
मोहाच्या योगानें, ज्ञान्याहि भ्रांति पडतसे मोठी ॥
ऱ्यावरि ईशदया बहु, तोचि दूर ह्या मनांतुनी लोटी॥
मद. धनयौवनादियोगें, येतो जो माज तोचि मद जाणे
रावणबाणार्जुनमुख नाशियले वश करोनियां ज्याणें॥
मत्सर परदुःखसुखानीं जो, क्रमें करित सौख्य, दुःख, मत्सर
त्यातें सोडुनि संगीं, चित्त तुझें साधुंच्याचि वत्स रतो
[illegible] त्रैलोक्याही जिंकी, त्याला विजयी अह्मी कधीं न ह
परि ह्या षड्रिपुवर्गा, जिंकी त्यालाच मात्र विजयि गणु
आहे एक जगाचा, सृष्टिस्थितिनाशनास कर्ता रे ॥
ज्याणें इच्छामात्रें, निर्मियले, भूखगोल खग तारे॥ ८
[illegible] श्रीरामादिक रूपा, घेउनियां जो जगांत अवतरतो
त्यातें प्रेमपुरःसर, भजतो निश्चयें मनुष्य भव तरतो॥८
शिवाजीच्या वैराग्य उत्पन्न होतें. ऐसा तो दासकृता, बोधा ऐकुनि विरागयुत चित्तें ॥
मानी तत्काळ मनीं, तृणवत् सारीं सदारसुतवित्तें ॥८

---

१ जी वादी ती ( अज्ञानमूलक मोहानें सर्प भासतो. ) २ मोहाला. ३ रावण, बाणासुर, कार्तवीर्यार्जुन इत्यादिकांस प्रसिद्ध मद आहेत. ) ४ ज्या पदानें. ५ पराच्या दुःखानें व पराच्या सुखानें दुःख व्हावें असा मत्सरात गुण आहे. ६ संगीं. ७ सज्जनांच्या. ह्या षष्ठीचा संबंध संगीं याकडे. ८ भूगोल, खगोल व नक्षत्रें. ९ निश्चयेंकरून ( हें अव्यय होय. )

